# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहाय्यक आयुक्त, 'सी' विभाग यांचे कार्यालय,**

**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई -४०००२**

**<u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>**

'सी' विभाग परिसरातील चाळी व इमारतीमधून घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे व त्यासंलग्न सामाईक घरगल्लांची साफसफाई करणे या योजनेअंतर्गत काम करण्यासाठी इच्छुक स्थानिक / सदर कामाचा अनुभव प्राप्त संस्थांकडून अर्ज मागवून त्यांची पात्रता यादी तयार करण्यात येत आहे. इच्छुक स्थानिक / सदर कामाचा अनुभव असणा-या संस्थांना सामाईक घरगल्ली स्वच्छतेच्या कामाचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (सदर कामात 'सी' विभागातला अनुभव असल्यास संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. कामाच्या आवश्यकतेनुसार २४ संस्थांची आवश्यकता आहे. आवश्यकतेनुसार 'सी' विभागात समाधानकारक काम केलेल्या अथवा करीत असलेल्या संस्था पुरेशा प्राप्त होऊ न शकल्यास परि.-१ मधील सामाईक घरगल्ली स्वच्छतेचा १ वर्षाचा अनुभव प्राप्त संस्थांचा विचार करण्यात येईल.) इच्छुक स्थानिक संस्थांनी हाऊसगल्ली साफसफाईचे काम समाधानकारकरीत्या पूर्ण केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुक स्थानिक संस्थांना या योजनेची सर्व माहिती, निविदा अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी रु. ४२८३.४०/- (रु. ३,६३० + १८% जीएसटी) एवढी रक्कम नागरी सुविधा केंद्रात भरणा केल्यानंतर विभागीय सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग कार्यालयात सहाय्यक अभियंता (घकव्य) 'सी' विभाग यांच्याकडुन दि. १८.०८.२०२५ ते दि. २५.०८.२०२५ या दिवशी सकाळी ११.०० वाजता ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल.

संस्थेने 'सी' विभाग कार्यालयात अर्ज जमा करण्याची अंतिम दिनांक २५.०८.२०२५ (दुपारी. ०२.०० वाजेपर्यंत).

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग**